नियमीत दिवाणी दावा क्र.३१/२००१
गंगाधर वि.अब्दुल.

**<u>नि.क्र.१७० खालील आदेश</u>**

**१.** उपअधिक्षक, भूमीअभिलेख, अहमदपूर यांनी नि.क्र.१७० हे पत्रवजा अहवाल या न्यायालयात सादर केला. त्यामध्ये त्यांनी मौजे अहमदपूर येथील सर्व्हे क्र.१ व २ मधील सर्व्हे क्र.१/२ व २/५ यांची मोजणी करुन अहवाल सादर केला. सदरची मोजणी, पंचनामा वगैरे उभय पक्षांना मान्य व कबुल नाही असे त्यांनी आपल्या कथनांमध्ये लिहून दिले. सदरची मोजणी व त्यामधील नकाशा उभय पक्षकारांना मान्य नसल्याने तो कोणत्या मुद्दयावर मान्य नाही याबद्दल पुरावा जोपर्यंत समोर येत नाही तोपर्यंत सदर अहवाल वाचता येत नाही. त्यामुळे, सदर मोजणीदार यांना न्यायालयासमक्ष उपस्थित राहून त्यांनी केलेल्या मोजणीबद्दल त्यांचा जबाब नोंदविणे आवश्यक आहे. त्यांच्या जबाबात जर या मोजणीच्या अनुषंगाने उभय पक्षांनी नोंदविलेले आक्षेप समोर आले तर त्या मोजणीच्या अनुषंगाने पुढे दिलेला नि.क्र.१७१ या अर्जावर पुढील आदेश करण्यात येईल. सबब, सदर मोजणीदार यांना त्यांनी केलेल्या वर नमूद सर्व्हे क्रमांकाच्या मोजणीचे नकाशे, टिपणबुक, पंचनामे व संबंधीत सर्व कागदपत्रे घेवून न्यायालयात साक्षीकामी उपस्थित रहावे त्यात कसूर करु नये.

**२.** उभय पक्षांनी सदर मोजणी अहवालाच्या व नकाशाच्या अनुषंगाने त्यांच्या असलेल्या हरकती लेखी स्वरुपात न्यायालयास कळवाव्यात किंवा सदर साक्षीदारास त्या अनुषंगाने प्रश्न विचारावेत.

स्वाक्षरीत/-

**दिनांक २८/०७/२०२५.**

**[एस.एन.सरडे]**
**दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहदमपूर.**